RNI No. MAHBIL /2009/40124

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग पाच

वर्ष ८, अंक १] शुक्रवार, मार्च ४, २०२२/फाल्गुन १३, शके १९४३ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २६.००

### असाधारण क्रमांक १

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.**

---

### महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

महाराष्ट्र विधानसभेत दिनांक ४ मार्च, २०२२ रोजी पुर:स्थापित करण्यात आलेले खालील विधेयक महाराष्ट्र विधानसभा नियम ११६ अन्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

### L. A. BILL No. I OF 2022.

A BILL
TO AMEND THE MAHARASHTRA SHOPS AND ESTABLISHMENTS (REGULATION OF EMPLOYMENT AND CONDITIONS OF SERVICE) ACT, 2017.

### सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक १.

**महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) अधिनियम, २०१७ यामध्ये सुधारणा करण्याकरिता विधेयक.**

२०१७ चा महा. ६१. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) अधिनियम, २०१७ यात सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या त्र्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) (सुधारणा) अधिनियम, २०२२, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६१ याच्या कलम १ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) अधिनियम, २०१७ (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा केलेला आहे), याच्या कलम १ मधील, पोट-कलम (३) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :— २०१७ चा महा. ६१.

"(३) (क) कलम ७ खेरीज करून, या अधिनियमाच्या तरतुदी, दहा किंवा त्यापेक्षा अधिक कर्मचारी नोकरीवर ठेवणाऱ्या आस्थापनांना लागू असतील.

(ख) कलमे ७ व ३६क यांच्या तरतुदी, दहापेक्षा कमी कर्मचारी नोकरीवर ठेवणाऱ्या आस्थापनांना लागू असतील.".

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६१ याच्या कलम १७ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम १७ मधील, खंड (छ) वगळण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६१ यामध्ये नवीन कलम ३६क समाविष्ट करणे.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३६ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

नामफलक मराठीत असणे.

"**३६क.** (१) कलम ६ अन्वये नोंदणी केलेल्या प्रत्येक आस्थापनेचा किंवा ज्या आस्थापनेला कलम ७ लागू आहे त्या प्रत्येक आस्थापनेचा नामफलक, देवनागरी लिपीतील मराठी भाषेमध्ये असेल :

परंतु, अशा आस्थापनेच्या नियोक्त्याकडे, देवनागरी लिपीतील मराठी भाषेव्यतिरिक्त इतर कोणत्याही भाषेतील व लिपीतील नामफलक देखील असू शकतील :

परंतु आणखी असे की, मराठी भाषेतील अक्षरलेखन, नामफलकावर सुरुवातीलाच लिहिणे आवश्यक असेल आणि मराठी भाषेतील अक्षरांचा टंक आकार, इतर कोणत्याही भाषेतील अक्षरांच्या टंक आकारापेक्षा लहान असणार नाही.

(२) ज्या आस्थापनांमध्ये मद्य पुरविले जाते किंवा विकले जाते, अशी आस्थापना, नामफलकावर महान व्यक्तींची किंवा गड-किल्ल्यांची नावे लिहिणार नाही.".

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) अधिनियम, २०१७ (२०१७ चा महा. ६१) (यात, यापुढे, ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केलेला आहे), यामध्ये दुकाने व इतर आस्थापना यांमध्ये नोकरीवर ठेवलेल्या कर्मचाऱ्यांच्या नोकरीच्या शर्तीचे आणि इतर सेवाशर्तीचे विनियमन करण्यासाठी तरतूद असून तो, दहा किंवा त्यापेक्षा अधिक कर्मचाऱ्यांना कामावर ठेवणाऱ्या आस्थापनांना लागू आहे.

२. उक्त अधिनियमाअन्वये केलेला, महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) नियम, २०१८ याचा नियम ३५ हा, नामफलक देवनागरी लिपीतील मराठी भाषेत प्रदर्शित करण्यासाठी प्रत्येक आस्थापनेस, अनिवार्य करतो.

विविध संघटनांनी शासनाच्या असे निदर्शनास आणून दिले आहे की, दहा पेक्षा कमी कर्मचारी असलेल्या काही आस्थापना, कलम ७ खेरीज, उक्त अधिनियमाच्या तरतुदी त्यांना लागू नसल्यामुळे, मराठीत नामफलक प्रदर्शित करीत नाहीत. म्हणून प्रत्येक आस्थापनेने, –मग दहा किंवा त्यापेक्षा अधिक कर्मचारी अथवा दहा पेक्षा कमी कर्मचारी नोकरीत असोत– तिचा नामफलक मराठीत प्रदर्शित करण्याचे अनिवार्य करण्याची मागणी विविध संघटनांकडून सातत्याने करण्यात येत आहे.

म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम ६ अन्वये नोंदणी केलेली प्रत्येक आस्थापना, आणि कलम ७ लागू असलेली प्रत्येक आस्थापना त्यांचा नामफलक, देवनागरी लिपीतील मराठी भाषेत प्रदर्शित करील, अशी तरतूद करण्याच्या दृष्टीने, त्यामध्ये नवीन कलम ३६क समाविष्ट करून, उक्त अधिनियमात यथोचित सुधारणा करणे शासनाला इष्ट वाटते. आस्थापनेच्या नियोक्त्यास देवनागरी लिपीतील मराठी भाषेव्यतिरिक्त इतर कोणत्याही भाषेतील व लिपीतील नामफलक देखील ठेवता येईल, तथापि, नामफलकावर सुरुवातीस मराठी भाषेतील अक्षरलेखन लिहिलेले असणे अत्यावश्यक असेल आणि मराठी भाषेतील अक्षरांचा टंक आकार, इतर कोणत्याही भाषेतील अक्षरांच्या टंक आकारापेक्षा लहान असणार नाही.

३. उक्त अधिनियमाच्या कलम १७ च्या खंड (छ) मध्ये, प्रत्येक कर्मचाऱ्याच्या ओळखपत्रावर आधार क्रमांक अंतर्भूत असण्याची तरतूद आहे. भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणाच्या विनंतीवरून, आधार (वित्तीय व इतर अर्थसहाय्य, लाभ व सेवा यांचे लक्षित वितरण) अधिनियम, २०१६ (२०१६ चा १८) याच्या कलम २९ चे पोट-कलम (४) आणि त्याखाली केलेले आधार (माहितीची देवाणघेवाण) विनियमन, २०१६ याचा विनियम ६ यांच्या तरतुदी लक्षात घेता, उक्त खंड वगळणे शासनास इष्ट वाटते.

४. वरील उद्दिष्टे साध्य करणे, हा या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई, **हसन मुश्रीफ,**
दिनांक २२ फेब्रुवारी २०२२. कामगार मंत्री.

**विधान भवन :** **राजेन्द्र भागवत,**
मुंबई, प्रधान सचिव,
दिनांक ४ मार्च, २०२२. महाराष्ट्र विधानसभा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.